## नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्र, एकलहरे येथे D.C. Supply System या विषयावर एक दिवसीय चर्चासत्र



महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मधील कर्मचारी व अभियंते यांचेकरिता (संयुक्तपणे) "D.C. Supply System" या विषयाची सखोल माहिती देण्याकरिता नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्र, एकलहरे येथे एक दिवसीय चर्चासत्र दिनांक २८ मे २००९ रोजी आयोजित करण्यात आले.

या चर्चासत्राचे उद्घाटन श्री.एस.बी. भांदेकर, अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) यांचे उपस्थितीत दिप प्रज्वलन व सरस्वती पुजन करून करण्यात आले. या चर्चासत्रात नाशिक, भुसावळ, परळी, वीर भाटघर, धोम, वारणा, वैतरणा व नाशिक जल विद्युत मंडळ येथील एकुण २२ अभियंते व कारागिरांनी सहभाग नोंदविला.

या चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी श्री.एस.बी. भांदेकर यांनी "D.C. Supply System" या विषयाचे महत्त्व व उपयुक्तता विषद केली. या चर्चासत्रातुन "D.C. Supply System" संबंधी अधिकाधिक माहिती घेण्याचा मौलिक सल्ला त्यांनी प्रशिक्षणार्थीना दिला. "D.C. Supply System" चे महत्व, बॅटरी व चार्जरचे कार्य, त्यांची देखभाल, "D.C. Supply System" इत्यादी बद्दलची सखोल माहिती यांनी सोदाहरण दिली. "D.C. Supply System" संपुर्ण Plant चे Heart म्हणुन कार्यरत असते, किंबहुना त्यावर मनुष्यबळ व मशिनची सुरक्षा सर्वस्वी अवलंबुन असते असे मत श्री.भांदेकर ह्यांनी उद्घाटन प्रसंगी नोंदविले.

या चर्चासत्राच्या समारोप प्रसंगी लाभलेले प्रमुख अतिथी श्री.एस.बी. खराबे मुख्य महाव्यवस्थापक, नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे यांनी हे चर्चासत्र अतिमहत्वाचे असल्याचे नमुद करून या चर्चासत्राबद्दल प्रशंसोद्‌गार काढले, चांगले Course Material चांगली शिकविण्याची हातोटी व प्रशिक्षणार्थींनी विषयास दिलेली चांगली साथ (ग्रहण) केल्यामुळे हे चर्चासत्र परिणामकारक झाले असे मत प्रगट केले.

या निरोप समारंभप्रसंगी श्री.आय.डी. कुळकर्णी (सहाय्यक अभियंता) नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, श्री.गांगर्डे (उपकार्यकारी अभियंता) नाशिक जल विद्युत मंडळ व श्री.देशपांडे वारणा जल विद्युत केंद यांनी आपल्या लेखी व तोंडी अभिप्रायामधुन सुंदर अभिप्राय व्यक्त केला व हे चर्चासत्र सर्व अभियंते व कारागिरांकरिता आयोजित करावे अशी विनंतीवजा सुचना केली.

या चर्चासत्राचे समन्वयक म्हणुन श्री.मोठाभाऊ पवार उपकार्यकारी अभियंता व श्री.दिलीप नाफडे सहाय्यक अभियंता यांनी विशेष परिश्रम घेतले.

## अग्निशमन सप्ताह २००९ परळी येथे संपन्न


अग्नीशमन प्रात्यक्षिक



दिनांक १४.०४.२००९ रोजी सकाळी ०९.०० वाजता मुख्य महाव्यवस्थापक श्री.पाऊल झगडे यांचे शुभ हस्ते अग्निशमन दिवसाचे व सप्ताहाचे उदघाटन करण्यात आले. सर्व प्रथम अग्निशमन कार्य बजावीत असतांना हुतात्मा झालेल्या जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

अग्निशमन दिवस व सप्ताह पाळण्यामागची पार्श्वभूमी श्री.डाबेराव सहा. अग्निशमन अधिकारी यांनी विशद केली.

श्री.पाऊलझगडे यांनी आपल्या भाषणात अग्निशमन कार्याविषयी मार्गदर्शन केले व अग्निशमन सेवे बद्दल सर्वांना प्रतिज्ञा दिली.

दिनांक १६.०४.२००९ रोजी पॉवर हाऊस एरिया मध्ये फायर मॉक ड्रिल सुरक्षितता अधिकारी यांचे मार्गदशनात घेण्यात आली.

अग्निशमन कार्यविषयी जनजागृती व्हावी करिता अग्निशमन : सुरक्षितता साहित्या विषयी प्रदर्शन भरविण्यात आले. मुख्य महाव्यवस्थापक यांचे हस्ते उद्घाटन करून अधिकारी, कर्मचारी यांना माहिती देण्यात आली. तसेच प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

सप्ताहामध्ये प्रत्येक दिवशी जनजागृतीपर कार्याक्रमावर भर देण्यात आला. अध्यक्ष श्री.पाऊलझगडे, मुख्य महाव्यवस्थापक, श्री.विभुते, महाव्यवस्थापक श्री.शामकुल, महाव्यवस्थापक, श्री.लसुंटे, श्री.पोहेकर, श्री.तासकर, श्री.कोठुळे, सर्व अधीक्षक अभियंता तसेच श्री.तराळे, से.सुरक्षितता अधिकारी व इत्यादी अधिकारी व कर्मचारी हजर होते. बाळगोपाल यांची गर्दी जमली होती. त्यांचे करिता प्रश्नमंजुषा कार्यक्रम ठेवण्यात आला व पेन चॉकलेट वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचलन श्री. बनकर यांनी केले. मा.मुख्य महाव्यवस्थापक श्री.पाऊलझगडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की ''प्रत्येकाने आपापले कर्तव्य दक्षतेने पार पाडले तर आग लागणार नाही, अपघात होणार नाही.'' आभार प्रदर्शन श्री.तराळे सु.अ. यांनी केले.

मोठी तेलाची आग लावून बहुउद्देशीय फोम वापरून आग विझविण्यात आली. व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. केंद्रातील अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यात मोलाचे सहकार्य दिले.